पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमीचे लेखाविषयक काम ॲडव्हेन्ट प्रोफेनल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड व मे.पी.व्ही.पागे ॲण्ड कंपनी यांचेकडून करून घेण्यास शासन मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : पुलदे-२०१८/प्र.क्र.१२७/सां.का.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २९ मार्च, २०१९

वाचा : प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांचे क्र. आस्थापना/२०१९/९४०, दि.१८.०१.२०१९ रोजीची पत्र.

प्रस्तावना :-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे वार्षिक महसूली जमा व खर्च तसेच स्वीय प्रपंजी लेखा जमा व परतावा यांचे लेखे दुहेरी नोंद पध्दतीने ठेवण्यात येतात. सदर काम करण्यासाठी अकादमीकडे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध नाही. यासाठी ॲडव्हेन्ट प्रोफेशनल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांना व वस्तु व सेवाकराची परिगणना तसेच ऑनलाईन GST Return भरणे तसेच आयकर ऑनलाईन Return भरण्याकरिता मे.पी.व्ही.पागे ॲण्ड कंपनी यांना सन २०१७-१८ या कालावधीतील उपरोक्त कामाबाबतचे कार्यादेश देण्यात आले होते. वित्तीय वर्ष २०१८-१९ करिता लेखा विषयक कामे करून घेण्यासाठी आणि सदर प्रयोजनार्थ संबधितांची व्यावसायिक फी अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -:

आता या शासन निर्णयान्वये प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी अकादमीमध्ये लेखाविषयक काम ॲडव्हेन्ट प्रोफेशनल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड व जीएसटी गणना, जीएसटी आकारणी आणि जीएसटी भरणा online पध्दतीने मे.पी.व्ही.पागे ॲण्ड कंपनी यांच्याकडून करुन घेण्याबाबतच्या प्रस्तावास या शासन निर्णयानुसार खालील तक्तामध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	सेवेचे नाव	न्यूनतम दरपत्रक सादर करणारे सेवा पुरवठादार	दरपत्रकात नमूद रक्कम
1	GST Calculation & Payment of GST	M/s P.V. Page& Co.	Rs.5000/- + out of pocket expenses + GST (per month)
2	GST Return filing services	M/s P.V.Page& Co.	Rs.10000/- + out of pocket expenses + GST (per month)
3	TDS Return filing (for the year 2018-19)	M/s P.V.Page& Co.	Rs.2500/- + out of pocket expenses + GST (per month)
4	Conversion of Accounts from Single entry to Double entry	Advent Professional Services Pvt. Ltd.	Rs.10000/- + out of pocket expenses + GST (per month)

०२. याबाबतचा खर्च मागणी क्र. झेडडी -२, २२०५, कला व संस्कृती, (००)(१०१) ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (२२०५ १४६३), १३, कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

०३. प्रस्तुत प्रकरणी लेखाधिकारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व प्रकल्प संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना "नियंत्रण अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यानुसार लेखाधिकारी यांनी भविष्यात अशा प्रकारच्या प्रस्तावांन संदर्भात उद्योग, उर्जा, व कामगार विभागाच्या दि. १.१२.२०१६ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

०४. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. ८९/२०१९/व्यय-१५, दि.२५.०३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३२९१७३०५९०१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.03.29 17:33:44 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. प्रधान सचिव (सां.का.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक.
२. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रकल्प संचालक, पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमी, मुंबई.
४. लेखाधिकारी, पु.ल. देशपांडे महाराष्ट कला अकादमी, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा),मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती, सां.का.२.